भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १७.०६.२०२० ते २१.०६.२०२०)

| अंक ४७/२०२० | दिनांक १६.०६.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०९/०६/२०२० ते १५/०६/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १७/०६/२०२० ते २१/०६/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/०६ | १०/०६ | ११/०६ | १२/०६ | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | दिनांक | | १७/०६ | १८/०६ | १९/०६ | २०/०६ | २१/०६ |
| २१.४ | ०.० | २०.६ | ४८.६ | १०६.२ | ५९.४ | २४.६ | पाऊस (मि. मी) | | ९५ | ८७ | ७७ | ७७ | १०२ |
| ३१.५ | ३३.५ | ३३.५ | २७.५ | २८.७ | ३१.० | ३४.५ | कमाल तापमान (अं. से) | | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| २३.० | २५.५ | २३.० | २३.० | २३.० | २३.५ | २४.५ | किमान तापमान (अं. से) | | २४ | २४ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ८४ | ८९ | ९२ | ९५ | ९६ | ९२ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ९५ | ९५ | ९५ | ९५ | ९६ |
| ७० | ६१ | ८६ | ९५ | ८९ | ७५ | ७६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९२ | ९१ | ९० | ९० | ९१ |
| १.१ | १.९ | २.५ | १.५ | १.८ | १.० | २.४ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | १३ | १२ | १२ | ८ | १० |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | नैऋत्य कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे |
| उत्तरोत्तर/ ईशान्य | दक्षिणोत्तर/ आग्नेय | पश्चिमोत्तर /वायव्य | स्थिर | स्थिर | उत्तरोत्तर/ ईशान्य | /ईशान्य | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ५३३.९ | ५३०.७ | २८८.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये स्थिर राहण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक १७ ते २१ जून २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मुसळधार तर दिनांक १६ व १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहून वाऱ्याच्या वेगातही वाढ होण्याचा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>दिनांक १६ व १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी पावसापूर्वी झाली होती व सध्य परिस्थितीमध्ये रोपे जरी लावणीयोग्य झाली असतील तरी अश्या ठिकाणी भाताची पुनर्लागवड किमान दोन दिवस तरी पुढे ढकलण्यात यावी. |
| नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी नागली पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>दिनांक १६ व १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी पावसापूर्वी झाली होती व सध्य परिस्थितीमध्ये रोपे जरी लावणीयोग्य झाली असतील तरीअश्या ठिकाणी नागली ची पुनर्लागवड किमान दोन दिवस तरी पुढे ढकलण्यात यावी |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जुन पर्यंत करावी. येत्या आठवड्यात मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी पावसाचा अंदाज पाहून करावी.<br>डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे.<br>सततचा पाऊस व ओलाव्यामुळे भुईमुगामध्ये येणाऱ्या मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम३ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात चोळावे.<br>दिनांक १६ व १७ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी राहिली असल्यास भुईमुगाची पेरणी दोन दिवस पुढे ढकलण्यात यावी व नंतर पावसाचा अंदाज पाहूनच पेरणी करावी |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये आद्रतेचे प्रमाण वाढणार असल्यामुळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी. आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| काजु | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी.<br>काजुवर खोडिकडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली रोपे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी. नारळ व सुपारीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | पेरणी/लागवड | भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची पेरणी/लागवड करावी लागवड करण्यास योग्य हवामान असुन पाऊसाचा अंदाज पाहून पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करून त्यावर मध्यभागी लागवड करावी. |
| कुक्कुटपालन | कोंबड्यांना रानीखेत रोगापासुन संरक्षण करण्यासाठी पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करून घ्यावे. | |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१